॥ शोधिसी मानवा राऊळी मंदिरी ॥

गायकः महम्मद रफी
गीतः वंदना विटणकर
संगीतः श्रीकांत ठाकरे

शोधिसी मानवा राऊळी मंदिरी
नांदतो देव हा आपुल्या अंतरी ॥ धृ. ॥

मेघ हे दाटती कोठुनी अंबरी
सूर येती कसे वाजते बासरी।
रोमरोमी फुले तीर्थ हे भूवरी
दूर इंद्रायणी दूर ती पंढरी ॥ १ ॥

गंध कां हासतो पाकळी सारुनी
वाहते निर्झरी प्रेम संजीवनी।
भोवताली तुला साद घाली कुणी
खूण घे जाणुनी रूप हे इश्वरी ॥ २ ॥

भेटतो देव कां पूजनी अर्चनी
पुण्य कां लाभते दानधर्मातुनी।
शोध रे दिव्यता आपुल्या जीवनी
आंधळा खेळ हा खेळशी कुठवरी ? ॥ ३ ॥